| प्रकरण चार |
| --- |
| लघुपाटबंधारे विभाग (परिच्छेद क्रमांक 4.398 ते 4.406) |

**4.398 लघुसिंचन विभाग 13,000 धडक सिंचन विहीरीचे बांधकामातील अनियमिततेबाबत.**
**पंचायत समिती तिरोडा, जिल्हा गोंदिया (परिच्छेद क्रमांक 11)**

पंचायत समिती तिरोडा यांचे सन 2021-22 चे लेखापरीक्षणात 13,000 धडक सिंचन विहिर बांधकाम नस्तीची तपासणी केली असता आढळून आलेल्या अनियमिततांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. कार्यारंभ आदेशातील अटी व शर्ती नुसार कार्यारंभाच्या दिनांकापासून लाभार्थीला 6 महिन्यात सदर विहीरीचे काम पूर्ण करणे आवश्यक असताना 150 लक्षांकापैकी 87 विहिरीचे काम अपूर्ण स्थितीत आहे.

2. दोन लाभार्थ्यांच्या कार्यारंभ आदेशापूर्वी 7/12 दिनांक 05/09/2019 व काम पुर्ण झाल्यानंतर 7/12 दिनांक 01/06/2020 दोन्ही सातबारा उतारामध्ये सिंचनाचे कॉलममध्ये बोरवेल बाबत उल्लेख असून नवीन विहीर केल्याबाबत नोंद नाही. संबंधीत शेतकऱ्याकडे आधीच बोरवेल असल्याने दुसऱ्या गरजु लाभार्थीची निवड न केल्याने रक्कम रुपये 4,89,399/- नियमबाह्य प्रदान झाल्याचे दिसून येते.

3. एका लाभार्थ्याचा गट क्रमांक 125/1 आराजी 0.60 आर मंजुर यादीतील अनुक्रमांक 20 जूना 7/12 मध्ये सिंचनाचे साधन तलाव असा उल्लेख आहे. तर नविन 7/12 दिनांक 25/02/2022 मध्ये सिंचनाचे साधन बोरवेल बाबत उल्लेख आहे. परंतु मुल्यांकन नोंदवही क्रमांक 1996 पान क्रमांक 10 ते 13 वर विहीरीबाबत खर्च नोंदविला आहे. नविन विहीर बांधकाम पुर्ण केल्याबाबत 7/12 उताऱ्यामध्ये विहीरीची नोंद नाही. त्यामुळे प्रदान रक्कम रुपये 1,71,899/- वसुल करणे आवश्यक आहे.

4. मंजुर यादीतील अनुक्रमांक 57 वरील लाभार्थ्यांचे 7/12 उताऱ्या मध्ये तलावाबाबत उल्लेख असताना रक्कम रुपये 1,16,305/- पहिले व अंतिम देयकाचे नियमबाह्य प्रदान केले आहे. अशा प्रकारे बऱ्याच लाभार्थीकडे ओलीताचे साधने असताना सातबारा उताराची विभागाने तपासणी न करता लाभ दिल्याचे दिसून येते.

5. मंजुर लाभार्थ्याचे नाव अनुक्रमांक 16 वर असून 7/12 उतारामध्ये सरकारी कालवा वरुन ओलीत होते म्हणून उल्लेख असून, 1 ते 26 वारसदारांकडून रुपये 100/- च्या स्टॅम्पपेपरवर संमतीपत्र घेतले असून मंजूर लाभार्थ्याचे नाव अनुक्रमांक 16 वर असताना सर्वे क्रमांक जोड्डन न घेता लाभ देण्यात आला आहे. तसेच 25 लाभार्थीनी याआधी कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ घेतल्या बाबतचा पुरावा जोडला नाही. तसेच आराजी कमी असताना व सरकारी कालवा असताना मुल्यांकन नोंदवही क्रमांक 267 पान क्रमांक 1 ते 10 नुसार नियमबाह्य लाभ दिला आहे. त्यामुळे प्रदान केलेली रक्कम रुपये 2,03,378/- वसुल करणे आवश्यक आहे.

6. मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता मोजमाप पुस्तिकेत दिनांकीत स्वाक्षरी नाही. तसेच काम चालू असताना प्राथमिक अवस्थेतील कामांना भेटी देवून शाखा अभियंता, उप अभियंता यांनी तपासणी करुन मार्गदर्शन करावयाचे असताना तशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

7. बँकेला दिलेले पत्र बँकेला मिळालेली पोच पावतीची प्रत साक्षांकीत करुन सादर करणे आवश्यक आहे. परंतु तशी पोचपावती सादर न केल्याने बँक खाते क्रमांक आधार कार्ड क्रमांकाशी जोडल्याची खात्री होत नाही.

**4.399 पानसारा थकबाकी रक्कम रुपये 15,07,884/- वसुली अभावी प्रलंबीत असणेबाबत.**
**पंचायत समिती तिरोडा, जिल्हा गोंदिया (परिच्छेद क्रमांक 12)**

पंचायत समिती तिरोडा यांचे सन 2021-22 चे लेखापरीक्षणात पानसारा थकबाकी रुपये 15,07,884/- वसुली अभावी प्रलंबीत असल्याचे दिसून आले. याबाबत खालीलपप्रमाणे अभिप्राय आहे.

लघुपाटबंधारे विभाग, परिपत्रक क्रमांक सिंचन-1001/282/2001/सिव्यं दिनांक 21.12.2001 अन्वये शाखा अभियंता / सहायक अभियंता/ उप विभागीय अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांना शासन निर्देशानुसार निश्चिती केलेल्या टक्केवारी नुसार पाणीपट्टी वार्षिक उद्दिष्ट गाठण्याचे प्रयत्न करण्याच्या सुचना दिलेल्या असताना त्यानुसार कार्यवाही होत नसल्याने पाणीपट्टी थकबाकीची रक्कम वसुली अभावी प्रलंबित आहे.

महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडुन व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 21 नुसार पाणी वापर संस्था व कार्यकारी अभियंता यांच्यातील करारनाम्याच्या तरतुदीनुसार प्रलंबित पाणी पट्टीच्या रकमेवर दंड व

नुकसान भरपाई आकारण्याचे जलसंधारण विभागास अधिकार असल्याने त्यानुसार दंडाची आकारणी करून संपुर्ण थकबाकीची रक्कम रुपये 15,07,884/- दंडासह वसुल करणे आवश्यक आहे.

**4.400 लघुसिंचन उपविभाग, पंचायत समिती आमगाव, सन 2021-22 या वित्तिय वर्षात 13000 धडक सिंचन विहीर कार्यक्रमांतर्गत केलेल्या पूर्ण कामांतील अनियमिततांबाबत.**

**पंचायत समिती आमगाव, जिल्हा गोंदीया, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 20)**

पंचायत समिती आमगांव यांनी सन 2021-22 मध्ये 13,000 धडक सिंचन विहीर योजनेवर रुपये 42,96,503/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. 13000 धडक सिंचन विहीर कार्यक्रमांतर्गत 110 विहिरींचे लक्षांका पैकी 88 विहिरींसाठी कार्यारंभ आदेश मिळाले असून 3 विहिरी पूर्ण, 33 अपूर्ण आहेत तर 52 विहिरींची कामे सुरूच झाली नाहीत. आदेशातील अटींनुसार 15 दिवसांत काम सुरू करून 30 जून 2020 पूर्वी पूर्ण करणे आवश्यक होते. तरीही कामे अपूर्ण राहिल्याने लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळाला नाही व शासनाचा निधी अडकून पडला आहे.

2. कार्यारंभ आदेशातील अट क्रमांक 1 नुसार विहीर बांधकाम करताना लाभार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने भरलेली माहिती चुकीची आढळल्यास मंजुरी रद्द करण्यात येईल असे स्पष्ट नमूद असताना दोन लाभार्थ्यांची शेती जलसिंचीत असतानासुद्धा अजलसिंचित दर्शवून नियमबाहयरित्या विहारींचा लाभ दिल्याने गंभीर अनियमितता झाली आहे. त्यामुळे दोन लाभार्थ्यांना प्रदान रक्कम रुपये 4,44,082/- मान्य करता येत नाही.

3. सदर कामाच्या प्राकलनासोबतच्या वहन अंतराच्या विवरणपत्रात (Lead Statement) मध्ये 20 mm Metal साठी पाचगाव जिल्हा नागपूर हे खाणीचे स्थान दर्शवून वहन अंतर 180 किलोमीटर दर्शविले आहे. यासाठी 3 कामातील बाब क्रमांक 4 Providing Casting in Situ metal for R.C.C.Work चे घेतलेले मुल्यांकन व प्रत्यक्ष येणारे मुल्यांकन दरात तफावत येत असून दरात वाढ होऊन 3 कामाच्या बाब क्रमांक 4 वर रक्कम रुपये 54,466/- चे झालेले जादा प्रदान संबंधितांकडुन वसुल करणे आवश्यक आहे.

4. नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक विहीर-2016/प्र.क्र.31/रोहयो-5 दिनांक 11 सप्टेंबर 2016 मधील अट क्रमांक 1.7 व 1.9(2) नुसार कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यानंतर 30 दिवसाच्या आत लाभार्थ्याने काम सुरु करून 6 महिन्याच्या आत काम पूर्ण करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

5. उपरोक्त शासन निर्णयातील अट क्रमांक 1.14 नुसार त्रयस्त संस्थेमार्फत विहिरीच्या कामाची भौतिक तपासणी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे करावयाची असताना अशी कार्यवाही केली नाही.

6. उपरोक्त शासन निर्णयातील परिशिष्ट 'अ' नुसार सिंचन विहिरीचे काम 20 टक्के पूर्ण झाल्यावर (रुपये 50,000 पर्यंत) अनुदान देऊन एकूण 5 टप्प्यात अनुदान अदा करणे आवश्यक असताना दोन किंवा तीन टप्प्यात पूर्ण अनुदान अदा केल्याने नियमबाह्य कार्यवाही केली आहे.

**4.401 तलाव लिलावाची/ लिजची थकीत रक्कम वसुली न करणेबाबत.**

**पंचायत समिती देवरी, जिल्हा गोंदिया, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 20)**

पंचायत समिती देवरी यांचे सन 2021-22 चे लेखापरीक्षणामध्ये पंचायत समितीने सादर केलल्या विवरण पत्राची तपासणी केली असता दिनांक 31.03.2022 अखेर 69 तलाव लिलावाची एकुण लीज रक्कम रुपये 2,39,923/- थकीत आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 141(क) मधील तरतुदीनुसार कार्यवाही करुन तलाव लिलावाची थकीत रुपये 2,39,923/- वसुल करुन योग्य शिर्षात जमा करणे आवश्यक आहे.

**4.402 तलाव लिलावाची/ लिजची थकीत रक्कम वसुली न करणेबाबत.**

**पंचायत समिती सडक अर्जुनी, जिल्हा गोंदिया, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 13)**

पंचायत समिती सडक अर्जुनी यांचे सन 2021-22 चे लेखापरीक्षणामध्ये सादर केलेल्या विवरणपत्रांची तपासणी केली असता तलाव लिलावाची/लिजची रक्कम रुपये 1,50,000/- थकीत असल्याचे निदर्शनास येते. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहे.

तलाव लिजच्या विवरणपत्रानुसार एकूण प्रस्तावित रक्कम रुपये 4,37,100/- व भरणा केलेली रक्कम रुपये 2,87,100/- असल्याने एकूण रक्कम रुपये 1,50,000/- थकीत असल्याचे निदर्शनास येते. महाराष्ट्र जिल्हा

परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 141(क) मधील तरतुदीनुसार कार्यवाही करुन सदर तलाव लिलाव/लिजची थकीत रक्कम वसुल करुन योग्य शिर्षात जमा करणे आवश्यक आहे.

**4.403 लघुसिंचन उपविभाग, पंचायत समिती गोरेगाव, सन 2021-22 या वित्तिय वर्षात 13000 धडक सिंचन विहीर कार्यक्रमांतर्गत केलेल्या पूर्ण कामांतील अनियमिततांबाबत.**

**पंचायत समिती गोरेगाव, जिल्हा गोंदिया, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 8)**

पंचायत समिती गोरेगांव यांनी सन 2021-22 मध्ये 13,000 धडक सिंचन विहीर बांधकामावर एकुण रक्कम रुपये 12,39,410/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. 13000 धडक सिंचन विहीर कार्यक्रमांतर्गत एकूण लक्षांक 150 विहिरीपैकी 39 विहिरींचे काम सुरु करण्याचे कार्यारंभ आदेश प्राप्त होऊन 5 विहिरींचे बांधकाम पूर्ण झाले असून 34 विहिरींचे काम अपूर्ण व 111 विहिरींचे बांधकाम सुरूच केले नसल्याचे आढळले. जिल्हा जलसंधारण अधिकारी, लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद गोंदिया यांचे कार्यारंभ आदेशातील अट क्रमांक 7 नुसार लाभार्थ्याने कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून 15 दिवसाचे आत विहिरीचे काम सुरु करून दिनांक 30 जुन 2021 पूर्वी पूर्ण केले नाही.

2. परिच्छेदात नमूद दोन लाभार्थ्यांची शेती जलसिंचीत असताना सुद्धा अजलसिंचित दर्शवून नियमबाह्यरित्या विहारींचा लाभ दिला आहे.

3. प्राकलनातील Lead Statement मध्ये 20 mm मेटलसाठी पाचगाव, जिल्हा नागपूर येथील खाण दर्शवून 180 किलोमीटर वहन अंतर दाखविले आहे. परंतु पंचायत समितीच्या इतर कामांमध्ये चीरचाळबांध खाण व 45 किलोमीटर अंतर धरुन दर रुपये 683.54 प्रति घनमीटर घेतला आहे, तर लघुसिंचन विभागाने बाब क्रमांक 4 साठी खाणीचे अंतर जास्त दर्शविल्याने रुपये 1712.33 प्रति घनमीटर दर घेतला आहे. त्यामुळे रुपये 1028.79 प्रति घनमीटर जादा दर देण्यात आला असून खाणीचे अंतर जास्त दर्शविल्याने एकूण रुपये 98,284/- चे झालेले जादा प्रदान संबंधीतांकडून वसूल करणे आवश्यक आहे.

4. नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक विहीर-2016/प्र.क्र.31/रोहयो-5 दिनांक 11 सप्टेंबर 2016 मधील 1.7 व 1.9(2) नुसार कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यानंतर 30 दिवसाच्या आत काम सुरु करून 6 महिन्याच्या आत पूर्ण करणे आवश्यक असताना सहा महिन्याच्या आत काम पूर्ण झाल्याचे दिसून येत नाही.

5. उपरोक्त नमूद शासन निर्णय दिनांक 11 सप्टेंबर 2016 मधील 1.9(5) नुसार पूर्ण झालेल्या विहिरींची नोंद घेतलेला नवीन नमुना सात/बारा सादर करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केली नाही.

6. उपरोक्त नमूद शासन निर्णय दिनांक 11 सप्टेंबर 2016 मधील नमूद अट क्रमांक 1.14 नुसार त्रयस्त संस्थेमार्फत विहिरीच्या कामाची भौतिक तपासणी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे करावयाची असताना अशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

7. उपरोक्त नमूद शासन निर्णय दिनांक 11 सप्टेंबर 2016 नुसार सिंचन विहिरींचे रक्कम रुपये 50,000/- पर्यंतचे काम लाभार्थ्यांने पूर्ण केल्यावर म्हणजेच 20 टक्के काम पूर्ण झाल्यावर त्यास अनुदान अदा करणे आवश्यक असताना एक किंवा दोन टप्प्यात पूर्ण अनुदानाची रक्कम नियमबाह्य अदा केली आहे.

**4.404 13,000 सिंचन विहीर कार्यक्रमाबाबत.**

**पंचायत समिती ब्रम्हपुरी, जिल्हा चंद्रपुर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 3)**

पंचायत समिती ब्रम्हपूरी यांना सन 2021-22 मध्ये एकुण 159 सिंचन विहिरीचा लक्षांक दिलेला असुन लाभार्थ्यांना एकुण रक्कम रुपये 17,50,000/- प्रदान केले आहेत. मार्च 2022 अखेर फक्त 83 कामांची सुरुवात झाली असुन एकाही विहिरीचे काम पूर्ण झालेले नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम 2009 अन्वये कलम 21 नुसार सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतापासुन 500 मीटर परिसरात नविन सिंचन विहिर घेत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र नाही.

2. वरीष्ठ भूवैज्ञानिक यांचे कार्यालयाचे शिफारस पत्रातील अट क्रमांक 3 नुसार नव्याने प्रस्तावित सिंचन विहिरीपासुन लगतच्या विहिरीचे अंतर 150 मिटर पेक्षा कमी नसल्याची तसेच सिंचन विहिरीची घनता लागवडी योग्य क्षेत्राच्या 8 (आठ) विहिरी प्रती चौरस किलोमीटर पेक्षा जास्त राहणार नाही, याबाबतचे कोणतेही अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

3. सिंचन विहिर बांधकामाचे देयक प्रदान करताना रॉयल्टीची रक्कम कपात न करता देयक अदा केले तसेच सिंचन विहिरीच्या मोजमाप पुस्तीकेनुसार सिंचन विहिरीचे काम पूर्ण झालेले नसुनही लाभार्थ्याच्या 7/12 वर विहिरीची नोंद अगोदरच घेण्यात आल्याचे निदर्शनास आले. तसेच कार्यारंभ आदेशानुसार सिंचन विहिरीच्या बांधकामावर व पाण्याच्या प्रवाहाच्या भागामध्ये स्थानिक प्रजातीच्या वनस्पतीची लागवड करणे बंधनकारक असुन त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. तसेच मोजमाप पुस्तिकेवर दिनांकित स्वाक्षरी घेणेत आली नाही.

4. 13,000 सिंचन विहिरीच्या रोख पुस्तकाचा बँक पासबुक/बँक स्टेटमेंट सोबत ताळमेळ घेतला नाही. 13,000 सिंचन विहिरीच्या रोख पुस्तकानुसार अखेरची शिल्लक रुपये 50,34,714/- व पासबुक नुसार अखेरची शिल्लक रुपये 62,38,463/- असून सदर रोखपुस्तक व बँक पासबुक मध्ये रुपये 12,03,749/- ची तफावत आहे.

**4.405 मासेमारी तलाव लिलावा बाबत.**

**पंचायत समिती ब्रम्हपुरी, जिल्हा चंद्रपुर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 11)**

पंचायत समिती ब्रम्हपुरीचे सन 2021-22 चे लेखापरीक्षणामध्ये लीजवर दिलेल्या तलावांबाबतचे नस्तीची तपासण केली असता पंचायत समितीकडे एकुण 243 तलाव आहेत. एकुण 124 तलाव लिजवर देण्यात आले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. पंचायत समिती कडील 243 तलावांपैकी फक्त 124 तलावांचाच लिलाव झाला आहे. उर्वरित 119 तलावांचा लिलाव न झाल्यामुळे पंचायत समितीला उत्पन्न मिळत नाही. एकूण 57 मासेमारी तलावांचा लिलाव केला परंतु लिलाव करण्यात येत असल्याची वर्तमान पत्रातील जाहिरात नस्तीमध्ये दिसून आली नाही.

2. कृषी व सहकार विभाग, परिपत्रक क्रमांक मत्स्यवि-1186/सी.आर.173/पदुम-17, दिनांक 16.09.1986 तसेच ग्रामविकास विभाग परिपत्रक क्रमांक आयआरसी/1087/सी.आर.1968/35 दिनांक 10.08.1987 नुसार शासकीय नद्या जलाशये व धरणे यामधील मासेमारीचा ठेका वाटाघाटीने मच्छीमारांच्या सहकारी संस्थांना अग्रक्रमाने देणेबाबत तसेच कोणता तलाव द्यायचा, ठेका रक्कम किती ठरवायची या बाबत मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी यांचा सल्ला घ्यावा. त्यांच्या सल्ल्यानेच मत्स्य व्यवसायाचे ठेके द्यावे, अशा सुचना आहेत. परंतु याप्रकारची कार्यवाही केली नाही. तसेच सन 2021-22 मध्ये तलाव मच्छीमार संस्थांना न देता व्यक्तीगत स्वरुपात एकुण 33 तलाव लिलावाव्दारे 3 वर्षासाठी देण्यात आले आहेत.

3. तलाव लिलाव करताना ज्या तलावाच्या नावाने मासेमारी सहकारी संस्था स्थापन झाली आहे त्यांनाच तो तलाव विना लिलाव द्यायचा आहे. परंतु पंचायत समिती अंतर्गत 243 तलावावर कोणत्या मासेमारी संस्था स्थापन झाल्यात याची तलाव व संस्थानिहाय यादी पंचायत समितीकडे उपलब्ध नाही.

4. दिनांक 15.05.2018 रोजी झालेल्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मत्स्य व्यवसाय तलाव ठेका रक्कम निर्धारण सभेचे इतिवृत्तातील मुद्दा क्रमांक 5 नुसार एका सहकारी संस्थेला जास्तीत जास्त 5 तलाव देण्यात येतील असे असताना त्यापेक्षा जास्त तलाव दिल्याचे नोंदवही व अभिलेख्यांवरुन दिसून आले.

**4.406 तलाव लिलावातील अनियमितता बाबत.**

**पंचायत समिती मुलचेरा, जिल्हा गडचिरोली, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 27)**

पंचायत समिती मुलचेरा यांचे सन 2021-22 वर्षाचे लेखापरीक्षणामध्ये तलाव लिलावाची नस्ती तपासली असता 16 तलावांपैकी 14 तलावांचे लिलाव झाल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

1. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 अनुच्छेद 63 (सुधारण 2015) नुसार लिलाव करण्यात आलेल्या 14 तलावांचे करारनामे रुपये 500/- चा मुद्रांकावर करणे आवश्यक असताना रुपये 100/- च्या मुद्रांकावर केल्याने 14 तलावांच्या करारनाम्याचे रुपये 400/- प्रमाणे एकूण रुपये 5,600/- शासन महसूलाचे नुकसान झाले आहे. त्यामुळे सदर रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

2. दिनांक 31/03/2022 अखेर पर्यंत लिलाव रक्कमेपैकी रक्कम रुपये 29,200/- थकित असल्याचे दिसून आले. सदर थकित रक्कम त्वरित वसूल करण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

3. तलाव क्रमांक 10 व 11 यांचा एकत्रित लिलाव केला आहे. सदर बाबत लेखापरीक्षणास खुलासा सादर केला नाही. तसेच सदर तलाव जिल्हा परिषदेच्या मालकीचे असल्याबाबतचे दस्तऐवज दप्तरी ठेवणे आवश्यक आहे.

*****